शिवसेना आमदार सिध्दार्थ खरात यांनी केला पेनटाकळी कालव्याचा कार्यारंभ !
>> पान 2

उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी आनंद मठात आनंद दिघे यांना केले अभिवादन
>> पान 3

विकसित भारतातील 'समृद्ध महाराष्ट्र'चा संदेश शपथविधी सोहळ्याने दिला
>> पान 4

**सुविचार**

समर्पण आणि संयम यशाचे रहस्य आहे.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034




भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादन !


■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 116 ■ शुक्रवार, दि. 06 डिसेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


# देवेंद्र फडणवीस राज्याचे तिसऱ्यांदा मुख्यमंत्री

■ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत आझाद मैदानात शपथविधी

■ उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे, अजित पवार यांनी घेतली शपथ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : राज्याचे ३१ वे मुख्यमंत्री म्हणून राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस यांना मुख्यमंत्री पदाची शपथ दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत ऐतिहासिक आझाद मैदानावर झालेल्या शपथविधी समारंभात मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्यासमवेत उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ गंगुबाई संभाजी शिंदे, अजित आशाताई अनंतराव पवार यांना राज्यपालांनी पद आणि गोपनियतेची शपथ दिली. राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी शपथविधी सोहळ्याचे संचलन केले.**







आजच्या शपथविधी कार्यक्रमास मंचावर केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय आरोग्य मंत्री जगतप्रकाश नड्डा, केंद्रीय भूपृष्ठ परिवहन व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय कृषि मंत्री शिवराजसिंह चौहान, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, केंद्रीय वाणिज्य व उद्योगमंत्री पियुष गोयल, केंद्रीय परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ एस जयशंकर, केंद्रीय पर्यावरण मंत्री भुपेंदर यादव, केंद्रीय माहिती तंत्रज्ञान व रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, केंद्रीय अवजड उद्योगमंत्री एच डी कुमारस्वामी, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, केंद्रीय सूक्ष्म मध्यम लघू उद्योगमंत्री जितनराम मांझी, केंद्रीय दळणवळण मंत्री जोतिरादित्य सिंधिया, केंद्रीय संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू, केंद्रीय मत्स्य व्यवसाय व पशुसंवर्धन मंत्री राजीव रंजन सिंह, केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योगमंत्री चिराग पासवान, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री पेमा खांडू, आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा शर्मा, छत्तीसगढचे मुख्यमंत्री विष्णूदेव साय, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंग सैनी, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव, मेघालयचे मुख्यमंत्री कॉनरॅड संगमा, राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा, त्रिपुराचे मुख्यमंत्री मानिक साहा, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी, पुद्दुचेरीचे मुख्यमंत्री एन रंगस्वामी, ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन मांझी, मणिपूरचे मुख्यमंत्री एन बिरेन सिंह, नागालँडचे मुख्यमंत्री नेफ्यु रिओ, सिक्कीमचे मुख्यमंत्री प्रेमसिंह तमांग, केंद्रीय राज्यमंत्री सर्वश्री रामदास आठवले, मुरलीधर मोहोळ, प्रतापराव जाधव, रक्षाताई खडसे, विविध राज्याचे उपमुख्यमंत्री सर्वश्री केशव प्रसाद मौर्य, ब्रजेश पाठक, पवन कल्याण, राजेंद्र शुक्ला, अरुण सावो, विजय शर्मा, प्रेमचंद बैरवा, विजयकुमार सिन्हा, सम्राट चौधरी, कनक बर्धन सिंह देव, प्रवती परिदा, चौना मेन, प्रेसतोन त्यांसोंग, यांथुंगो पटॉन, टी. आर. झेलियांग, एस धार, श्रीमती दिया कुमारी यांच्यासह साधू, संत, महंत, विविध धर्मांचे गुरु, राज्यातील खासदार, आमदार, विविध राजकीय पक्षांचे वरिष्ठ नेते, उद्योग, क्रीडा, मनोरंजन क्षेत्रातील विविध मान्यवर, विशेष निमंत्रित अतिथी उपस्थित होते.

शपथविधी सोहळ्याची सुरुवात राष्ट्रगीत व राज्य गीताने करण्यात आली.

## मुख्यमंत्रीपदाच्या शपथेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची पहिली स्वाक्षरी वैद्यकीय मदतीच्या फाईलवर; पुण्याच्या रुग्णाला पाच लाखांची मदत

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी मुख्यमंत्र्यांनी पहिली स्वाक्षरी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या फाईलवर केली.

पुणे येथील रुग्ण चंद्रकांत शंकर कुऱ्हाडे यांना पाच लाखाची मदत मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून देण्याचे निर्देश त्यांनी फाईलवर दिले आहेत.

चंद्रकांत कुऱ्हाडे यांच्या पत्नीने बोन मॅरो ट्रान्सप्लांट उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अर्थसहाय्य देण्याची विनंती केली होती.

## जितेंद्र आव्हाड यांचा पोरकटपणा काही संपत नाही; आनंद परांजपे यांची आव्हाडांवर टिका



**ठाणे/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे गटनेता असलेले जितेंद्र आव्हाड यांचा पोरकटपणा काही संपत नाही, अशी बोचरी टिका राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते आनंद परांजपे यांनी माध्यमांशी बोलातना केली. यावेळी बोलताना आनंद परांजपे म्हणाले की, आज महायुतीच्या सरकारचा शपथविधी सोहळा आहे. फडणवीस हे तिसऱ्यांदा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेत आहेत. तर अजित पवार सहाव्यांना उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेत आहेत, याचा आनंद आहे. आज आमच्या इथून हजारो महिला पदाधिकारी आणि लाडक्या बहिणी सोहळ्यासाठी गेल्या आहेत.

गुलाबी आमंत्रण पत्रिका छापण्यात आल्या आहेत. हसत खेळत कालची पत्रकार परिषद पार पडली. एकनाथ शिंदे यांनी आज उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. याचा ठाणेकरांना आनंद आहे. ज्या वेळेस २ जुलै २०२३ ला अजित पवारांनी वेगळी भूमिका घेतली. तेव्हापासून मोदी आणि शहा यांच्यासोबत चांगले संबंध आहेत.

राऊत यांनी भविष्यात शिवसेनेची चांगली वाटचाल कशी राहील याचा विचार केला तर चांगल राहील,तर आव्हाड यांच्या आंदोलनाबाबत बोलताना सो कोल्ड आव्हाड यांचा पोरकटपणा काही संपत नाही, अशी टिका केली. तर शरद पवार,सुप्रिया सुळे,काँग्रेस च्या नेत्यांनी दिल्लीत निवडणूक आयोगाची भेट घेतली,आव्हाड यांनी देखील भेट घ्यावी, असा सल्ला दिला. ते एवढ्या मतांनी कसे निवडून आले यावर कदाचित त्यांना शंका असावी,ज्या दिवशी ते निवडून आले त्याच्या दुसऱ्या दिवशी काळीजवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा बंगल्यावर लोटांगन घालायला गेले होते. आता फडणवीस यांना भेटायला गेले तर काही आश्र्चर्य वाटणार नाही, अशी टिकाही राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते आनंद परांजपे यांनी माध्यमांशी बोलातना केली.

## फडणवीसांचे कौतुक, शिंदेंना चिमटा, शपथविधीवर राज ठाकरेंची खास पोस्ट

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी** : देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री होतील, अशी भविष्यवाणी करणारे मनसे अध्य राज ठाकरे शपथविधी सोहळ्याला वैयक्तिक कारणामुळे हजर राहू शकले नाहीत. मात्र शपथविधी झाल्यानंतर काही मिनिटातच समाज माध्यमावर शुभेच्छापर पोस्ट लिहून त्यांनी नव्या सरकारचे अभिनंदन केले. यावेळी फडणवीस यांचे कोडकौतुक करताना त्यांनी एकनाथ शिंदे यांना चिमटा काढला.

आज माझे स्नेही आणि भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्रातील नेते श्री. देवेंद्र फडणवीस यांनी तिसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली, याबद्दल त्यांचं अभिनंदन. २०१९ ला खरंतर ही संधी त्यांना मिळायला हवी होती, पण तेंव्हा आणि पुढे २०२२ मध्ये जे घडलं त्यामुळे ती संधी हुकली, असे राज म्हणाले.

यावेळी महाराष्ट्रातील जनतेने महायुतीला म्हणण्यापेक्षा देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाला प्रचंड अविश्र्वसनीय बहुमत दिले, असे म्हणत राज यांनी एकनाथ शिंदे यांना अप्रत्यक्षपणे चिमटा काढला.तसेच देवेंद्र फडणवीस यांच्या करिश्म्यामुळेच निर्विवाद यश मिळाल्याचे त्यांनी थेटपणे अधोरेखित केले.

मिळालेल्या बहुमताचा या राज्यासाठी, इथल्या मराठी माणसांसाठी आणि मराठी भाषा आणि संस्कृतीसाठी योग्य वापर कराल अशी आशा राज ठाकरे यांनी फडणवीस यांच्याकडून व्यक्त करतो.

पुढची ५ वर्ष सरकारच्या कुठल्याही चांगल्या उपक्रमांना माझा, माझ्या पक्षाचा पाठिंबा असेल असे सांगताना सरकार चुकतंय, लोकांना गृहीत धरतंय असं जर जाणवलं, तर मात्र विधिमंडळात जरी सध्या शक्य नसलं तरी, विधिमंडळाच्या बाहेर मात्र आम्ही सरकारला त्यांच्या चुकांची जाणीव करून देऊ हे नक्की, असा इशाराही दिला.

सरतेशेवटी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार आणि तसंच भविष्यातील त्यांच्या मंत्रिमंडळातील सर्व सहकाऱ्यांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने राज ठाकरे यांनी शुभेच्छा दिल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ ग्रहण केल्यानंतर मंत्रालयात प्रवेश केला. यावेळी या तिघांचेही सुवासिनींनी औक्षण केले. त्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री पवार यांनी मंत्रालय प्रांगणातील राजमाता जिजाऊ माँ साहेब, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतीराव फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना तसेच संविधान उद्देशिकेलाही अभिवादन केले.

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचे महापुरुषांच्या प्रतिमेस अभिवादन



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी मंत्रालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. तसेच जिजामाता शहाजीराजे भोसले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्याही प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



## भगवा तलाव परिसरात मॉर्निंग वॉकला येणाऱ्या संतप्त नागरिकांनी स्वतः हातात झाडू घेत केली साफसफाई

**कल्याण/प्रतिनिधी** : कल्याण पश्र्चिममध्ये स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत सुशोभीकरण केलेल्या भगवा तलावाची सध्या बिकट अवस्था झाली आहे. तलाव परिसरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले आहेत. झाडांना पाणी न मिळाल्याने झाडे सुकत चालली आहेत. नियमित मॉर्निंग वॉकसाठी येणाऱ्या नागरिकांना दुर्गंधीमुळे नाकाला रुमाल लावून फिरावे लागत आहे. दररोज हजारो लोकं तलावाजवळ येऊन स्वच्छ वातावरणाचा आनंद घेत असतात, पण सद्यस्थितीत त्यांना अस्वच्छता आणि बेवारस अवस्था सहन करावी लागत आहे.

## महाराष्ट्र औद्योगिक, शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात अग्रेसर राहण्यासाठी प्रयत्नशील - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्र औद्योगिक, शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात अग्रेसर राहील यादृष्टीने नियोजन करुन विकासाचा वेग वाढविण्यावर भर राहील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी आज मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर मंत्रालयातील मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर कक्षात माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार अतुल सावे, संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे, सचिव प्रवीण पुरो, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक ब्रिजेश सिंह आदी उपस्थित होते.

देशात महाराष्ट्र हे अग्रेसर राज्य राहील यासाठी सर्वंकष प्रयत्न केले जातील, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यातील पायाभूत सोयीसुविधांचे बळकटीकरण करून विकासाचा वेग वाढविण्यात येईल. मागील अडीच वर्षांत राज्य शासनाने घेतलेले विविध निर्णय कायम राहतील. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसह अन्य योजना सुरूच राहतील. त्यांची आगामी काळात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येईल. तसेच राज्य शासनाने मागील काळात दिलेल्या आश्र्वासनांच्या पूर्ततेसाठी बांधील असल्याचेही त्यांनी सांगितले.

राज्यातील सिंचनाचे प्रमाण वाढविण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येतील. त्यात नदी जोड प्रकल्पाचे काम सुरू करण्यावर भर राहील. सन २०२६ पर्यंत १६ हजार मेगावॅट सौरऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी सर्वंकष प्रयत्न केले जातील. राज्यातील जनतेच्या आमच्या सरकारकडून असलेल्या अपेक्षांच्या पूर्ततेसाठी प्रयत्न केले जातील. समृद्धी महामार्गामुळे जालना व छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यात उद्योग व्यवसाय वाढण्यास मदत होत आहे. याच धर्तीवर शक्तीपीठ मार्गासाठी संबंधित भागातील शेतकऱ्यांशी संवाद साधून मार्ग काढण्यात येईल.

राज्यात अधिकाधिक उद्योग येण्यासाठी शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. अनेक उद्योगांशी चर्चा सुरू असून ती अंतिम टप्प्यात आहे. हे उद्योग राज्यात आल्यानंतर रोजगार निश्र्चित वाढेल. मागील वर्षभरात राज्यात थेट परकीय गुंतवणुकीपैकी ९० टक्के गुंतवणूक केवळ मागील सहा महिन्यात आली आहे. हा वेग असाच कायम राहील, असा विश्र्वास मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला. महिलांच्या संरक्षणासाठी केलेल्या शक्ती कायद्याबाबत केंद्र सरकारशी संवाद साधण्यात येईल. शेतकरी कर्जमाफीबाबत केलेल्या घोषणेची अंमलबजावणी करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

## महिलांचे उध्दारकर्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर

आज डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन. आजच्याच दिवशी सण १९५६ साली डॉ बाबासाहेब आंबेडकर आपल्या लाखो अनुयायांना दुः खसागरात लोटून कायमचे निघून गेले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांना महापरिनिर्वाणदिनी विनम्र अभिवादन! डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी उभे आयुष्य दिन दलित, उपेक्षित, वंचित वर्गासाठी घालवले. या वर्गासाठी बाबासाहेबांनी जे कार्य केले ते तर सर्वानाच माहीत आहे पण डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी महिला वर्गासाठी जे कार्य केले ते खूप कमी लोकांना माहीत आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने महिलांचे उध्दारकर्ते आहेत पण दुर्दैवाने आजही देशातील अनेक महिलांना हे माहीतही नाही. बाबासाहेबांनी महिलांसाठी जे कार्य केले ते याआधी कोणीही करू शकले नाही. आपल्या पुरुष प्रधान संस्कृतीत स्त्रिया या गुलामच होत्या. स्त्रियांना गुलामाचीच वागणूक मिळत होती. अगदी उच्चवर्णीय स्त्रिया देखील गुलामीचेच जीवन जगत होत्या. डॉ बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्यांनंतर स्त्रियांनाच उपेक्षित मानत होते. मातोश्री रमाबाईला लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात महिलांच्या उन्नती व मुक्तीसाठी लढणारा मी योद्धा आहे. महिलांना या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी मी शेवटच्या क्षणापर्यंत लढेल. बाबासाहेबांनी त्यांचे बोल खरे करून दाखवले ते राज्यघटनेच्या माध्यमातून. बाबासाहेबांनी राज्यघटनेच्या माध्यमातून महिलांना इतके अधिकार दिले की जे त्यांना हजारो वर्ष आणि ३३ कोटी देवताही देऊ शकले शकले नाही. पुरुषप्रधान संस्कृती आणि मनुवादी विचारसरणीमूळे ज्या महिलांना पुरुषांच्या पायाशी स्थान होते त्या महिला आज पुरुषांच्या बरोबरीने उभ्या राहत आहेत. भारतीय महिला आज जो मोकळा श्र्वास घेत आहेत तो केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकरांमुळेच घेत आहेत. यासाठी भारतीय महिलांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांना प्रातः स्मरणीय आणि वंदनीय मानले पाहिजे. नोव्हेंबर १९३८ मध्ये कुटुंब नियोजना संबंधीचे विधेयक डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नांमुळेच मुंबई विधिमंडळात आले होते. त्यांनी महिलांच्या हितासाठी व कल्याणासाठी कुटुंब नियोजनाचा मार्ग दाखवला. मुलं केंव्हा पाहिजे याचे स्वातंत्र्य त्यांनी महिलांना दिले. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे भारताचे मजूर मंत्री असताना त्यांनी महिला सक्षमीकरणाचे अनेक निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली. खान कामगार महिलेला प्रसूती भत्ता, कोळसा खाणीत काम करणाऱ्या महिलांना पुरुषां इतकिच मजुरी, बहूपत्नीत्वला कायद्याने बंदी, मजूर व कष्टकरी महिलांना २१ दिवस किरकोळ रजा, एका महिन्याची हक्काची रजा, दुखापत झाल्यास नुकसान भरपाई आणि वैद्यकीय रजा, महिलांना पगारी प्रसूती रजा, २० वर्ष सेवा करुन निवृत्त झाल्यावर मरेपर्यंत निवृत्तिवेतन असे महिलांसाठी अनेक क्रांतिकारक निर्णय त्यांनी मजूर मंत्री असताना घेतले. बाबासाहेबांनी १९४७ साली कायदा मंत्री असताना हिंदू संहिता विधेयक अर्थात हिंदू कोड बिलाचा प्रस्ताव संसदेत मांडला. हे विधेयक क्रांतिकारी होते. हिंदू वैयक्तिक कायद्यात एकाच वेळी परस्परपूरक पुरोगामी तत्वे समाविष्ट करण्याचे हे क्रांतिकारक पाऊल होते. अस्पृश्यतेचे उच्चाटन, लग्नासंबंधातील स्त्री पुरुष समानता, नवऱ्याने केलेल्या अन्याय अत्याचाराविरोधात दाद मागण्याचा अधिकार, महिलांना घटस्फोट घेण्याचा अधिकार, वारसा हक्काचा लाभ महिलांनाही देण्याची तरतूद इत्यादी तत्वे या बिलात डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी समाविष्ट केली होती. डॉ बाबासाहेबांच्या मते सामाजिक न्यायचा लढा यशस्वी होण्यासाठी हिंदू समाजाचा वैयक्तिक कायद्यामध्ये जाती व्यवस्था आणि पुरुषप्रधानता यांना नकार देऊन समान वैयक्तिक संबंधांची पायाभरणी करणे आवश्यक आहे. दुर्दैवाने या विधेयकाला संसदेत प्रचंड विरोध झाला. सुरवातीला पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरुंचा या विधेयकाला पाठींबा होता पण काँग्रेसमधील सनातनी विचाराच्या नेत्यांनी या विधेयकाला प्रखर विरोध दर्शवल्यानंतर पंडित नेहरुंनी हे विधेयक मागे घ्यावे अशी विनंती बाबासाहेबांना केली. देशाची राज्यघटना बनवताना बाबासाहेबांनी जितकी मेहनत घेतली होती तितकीच मेहनत हे विधेयक बनवताना बाबासाहेबांनी घेतली होती. त्यामुळे बाबासाहेबांना खूप वाईट वाटले. हिंदू कोड बिलाला होणारा विरोध बाबासाहेबांसाठी खूप त्रासदायक ठरला शेवटी या मुद्द्यावरुन त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. कोणतीही चळवळ महिलांशिवाय पूर्ण होऊ शकत नाही, सामाजिक क्रांती करायची असेल तर त्यात महिलांचा समावेश असावाच असे बाबासाहेबांचे मत होते म्हणूनच त्यांच्या सर्व आंदोलनात महिलांचा समावेश होता मग ते १९२७ चे चवदार तळ्याचे आंदोलन असो की १९३० च्या नाशिकमधील काळाराम मंदिरातील आंदोलन असो. १९४२ च्या नागपुरातील महिला परिषदेत महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. लग्न हे मुलीच्या प्रगतीत अडसर ठरू नये. मुलीवर लग्न लादू नये ते तिच्या संमतीनेच व्हावे. लग्नानंतर बायको ही नवऱ्याची गुलाम नको मैत्रीण बनायला हवी. पतीच्या संपत्तीत पत्नी देखील समान वाटेकरी आहे. पत्नीच्या सुरक्षेची जबाबदारी पतीची असून तिला शारीरिक किंवा मानसिक त्रास जर पतीने दिला तर त्याला कायद्याने शिक्षा व्हायला हवी असे त्यांचे मत होते. भारतीय राज्यघटना लिहिताना डॉ आंबेडकरांनी राज्यघटनेच्या कलम १४, १५, १५(३), १६(२), ३९(क), ३९(घ), ३९(ड), ४२, ३२५ इत्यादी कलमांचा अंतर्भाव करून महिलांचे हित व कल्याण जोपासण्याचा प्रयत्न केला आहे. दुर्दैवाने देशातील महिला आजही बाबासाहेबांच्या या कार्याविषयी अनभिज्ञ आहेत. बाबासाहेबांचे भारतीय स्त्रियांवर अनंत उपकार आहेत. बाबासाहेबांनी महिलांसाठी इतके करून ठेवले आहे की अनेक जन्म घेऊनही हे उपकार फिटनार नाही.

# शिवसेना आमदार सिध्दार्थ खरात यांनी केला पेनटाकळी कालव्याचा कार्यारंभ !

दैनिक आपला विदर्भ





**मेहकर/प्रतिनिधीः** शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) आमदार सिध्दार्थ खरात यांनी आज मेहकर तालुक्यातील शेतकऱ्यांची रामधेनू असलेली पेनटाकळी प्रकल्पाच्या कालव्याबाबत असलेल्या समस्येवर उपाययोजना जाणून घेण्यासाठी अधिकाऱ्यांची बैठक घेऊन निर्देश दिले होते. त्यानुसार आज मेहकर तालुक्यातील शेतकऱ्यांनी पेनटाकळी लघु मध्यम प्रकल्पाच्या कालव्यातुन पाझरणाऱ्या पाण्याबाबत तसेच शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी पाणी मिळत नसल्याबाबत आमदार सिध्दार्थ खरात यांचेकडे मागणी केली.

त्यानुसार आमदार महोदयांनी तात्काळ पेनटाकळी प्रकल्पाचे संबंधित कार्यकारी अभियंता व इतर अधिका–यांसमवेत चर्चा करून वस्तुस्थिती जाणून घेतली. शेतक–यांची शेतीसाठी पाणि सोडण्याची मागणी वाढल्यामुळे अनेक वर्षापासून प्रलंबीत असलेले आर सी सी ट्रफ चे बांधकाम तात्काळ सुरू करण्याचे आदेश दिले. त्यानुसार आज दिनांक ५/११/२४ रोजी पेनटाकळी सिंचन प्रकल्पाचे ० ते ११ कि.मी. आर सी सी ट्रफ चे बांधकाम सुरू करण्यात आले असून त्याचा कार्यारंभ आमदार सिद्धार्थ खरात यांच्या हस्ते आज करण्यात आला.

यामुळे ० ते ११ कि. मी मध्ये शेतक–यांच्या जमिनी चिबडल्यामुळे शेतीचे होणारे नुकसान आता होणार नाही. तसेच ११ कि. मी. पुढील शेतक–यांना पाण्याचा अपव्यय न होता पाणि मिळणार आहे. ० ते ११ कि.मी.कालवा दुरुस्ती चा कंत्राट अंदाजे ७२ कोटी रु चा असून माणिक इन्फ्रास्ट्रक्चर,छत्रपती संभाजीनगर हे करणार आहेत.

कालव्यातील कचरा साफ करणे, झाडे, झुडपे तोडणे व ११ कि.मी.पुढील कालव्याची छोटी मोठी कामे सुद्धा लवकरच सुरू होणार आहेत. एकंदरीत ११ कि.मी.पर्यतच्या कामाकरिता कंत्राटदाराला १८ महिण्याचा काम पूर्ण करण्याचा कालावधी असला तरी हे काम विक्रमी वेळेत पूर्ण करण्याच्या सुचना आमदार खरात यांनी अधिका–यांना दिल्या आहेत.

बैठकीला निंबा भाऊ पांडव, तालुका अध्यक्ष मेहकर, श्री संजय वडतकर जिल्हा परिषद सदस्य, भास्करराव काळे, प्रदेश उपाध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष, ॲड. अनंत वानखेडे, ॲड. आकाश घोडे, ॲड. संदीप गवई, परमेश्वर वानखेडे , सरपंच पेमटाकळी, श्री चोपडे कार्यकारी अभियंता, एस ए. साळुंके, उपविभागीय अधिकारी एम.के.तांबागडे, शाखा अभियंता आर. पी.राजगुरू, सहाय्यक अभियंता गौरव जुआर,शाखा अभियंता आकाश शिंदे सह कर्मचारी उपस्थित होते.

## शिंदे, श्री. एकनाथ संभाजी



जन्म : ६ मार्च १९६४.

जन्म ठिकाण : अहिर, तालुका – महाबळेश्र्वर, जिल्हा – सातारा.

शिक्षण : बी.ए.

ज्ञातभाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती लता.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगा).

व्यवसाय : उद्योग व सामाजिक कार्य

पक्ष : शिवसेना

मतदार संघ : १४७ – कोपरी – पाचपाखाडी, जिल्हा – ठाणे.

इतर माहिती :

ठाणे येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष, सन १९८६ मध्ये महाराष्ट्र–कर्नाटक सीमा प्रश्र्न आंदोलनात १०० कार्यकर्त्यांसह सक्रीय सहभाग, ४० दिवस बेल्लारी येथे तुरुंगवास सहन केला, संपूर्ण ठाणे शहर व जिल्ह्यात सामाजिक कार्याचे जाळे निर्माण केले; ठाणे शहरात ओपन आर्ट गॅलरी, सचिन तेंडुलकर मिनी स्टेडियम, इंटरनिटी सुविधा भूखंडावर बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक, शहिद हेमंत करकरे क्रीडा संकूल, जॉगिंग पार्क, सेंट्रल लायब्ररी सुरु केली;

आदिवासी प्रभाग मोखाडा, तलासरी व जव्हार येथील आश्रम शाळेत व आरोग्य केंद्रात सकस आहार व आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन करुन गरीब रुग्णांना विनामुल्य औषध वाटप केले; पालघर, बोईसर व सफाळे परिसरात शिवसेने तर्फे एस.एस.सी. विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानमालेचे आयोजन, गरीब विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्यांचे वाटप, पूरग्रस्तांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप, वृक्षारोपण, आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन, बाल नाट्य महोत्सवाचे व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन, 'जाणताराजा' नाटकाचे अत्यल्पदरात आयोजन, अध्यक्ष, ठाणे जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन; उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य ॲथलेटिक्स संघटना, पूरग्रस्तांना मदत,

ठाणे शहराच्या सर्वांगीण विकासासाठी व आधुनिकीकरणासाठी विशेष योगदान; एमएमआरडी सक्षम बनविण्यात यश, नागपूर – मुंबई समृध्दी महामार्ग, वांद्रे–वरळी सी लिंक, वाशी येथील तिसरा खाडीपुल, मुंबई – पुणे द्रुतगतीमार्गची क्षमता वाढविण्यासाठी खालपूर– लोणावळा टनेल मार्ग, शिळ – कल्याण रस्त्याचे सहापदरीकरण, विदर्भात रेल्वेच्या २७ उड्डाणपूलाचे काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न; राज्यातील द्रुतगती मार्गावरील उपधान कमी करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या; ओझर्डे येथे ट्रामा केअर सेंटर सुरू केले; आरोग्य मंत्रीपदाच्या काळात आशा सेविकांची पगार वाढ केली; आदिवासी व दुर्गम भागात काम करणाऱ्या बी.ए.एम.एस. पदवी धारक कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांना सेवेत कायम करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला.

ठाणे शहरातील धोकादायक इमारतींचा पुनर्विकास केला; ठाणे मेट्रोच्या कामाला गती दिली; ठाणे– मुलुंड दरम्यान नव्या स्थानकाला मंजुरी मिळविली; ठाणे जिल्ह्यासाठी पाणी पुरवठा करणाऱ्या काळू धरणाच्या अडचणी सोडविण्यात यश; बारवी धरणाची उंची वाढविण्यासाठी मंजूरी मिळविली; एमएमआरडीला क्लस्टर योजना सुरू केली; ठाणे जिल्हा परिषद, तसेच कल्याण–डोंबिवली, उल्हासनगर, महानगरपालिकेत व अंबरनाथ, बदलापूर नगर परिषदेत शिवसेनेची सत्ता आणण्यात यश; १९८४ शिवसेना शाखा प्रमुख, वागळे इस्टेट, किसननगर; शिवसेना ठाणे जिल्हा प्रमुख; पक्षाच्या सर्व आंदोलनात सक्रिय सहभाग, १९९७ व २००२ दोन वेळा नगरसेवक, तीन वर्षे स्थायी समिती सदस्य, चार वर्षे सभागृह नेता, महानगरपालिका ठाणे.

२००४–२००९, २००९–२०१४, २०१४–२०१९ २०१९–२०२४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; २०१४–२०१९ विधीमंडळ शिवसेना पक्षाचे गट नेते; १२ नोव्हेंबर २०१४ ते ५ डिसेंबर २०१४ विरोधीपक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा; ५ डिसेंबर २०१४ ते नोव्हेंबर २०१९ सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री; तसेच जानेवारी २०१९ सार्वजनिक आरोग्य खात्याचा कार्यभार व ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री; डिसेंबर २०१९ पासून शिवसेनेचे गट नेते; नोव्हेंबर २०१९ – जून २०२२ नगर विकास व सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) खात्याचे मंत्री.

३० जून २०२२ रोजी मुख्यमंत्रीपदाची शपथ. खाती – सामान्य प्रशासन, नगरविकास, माहिती तंत्रज्ञान, माहिती व जनसंपर्क, परिवहन, सामाजिक न्याय, पर्यावरण व वातावरणीय बदल, खनिकर्म आणि इतर

नोव्हेंबर २०२४ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड, दिनांक ५ डिसेंबर २०२४ रोजी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ.

(संदर्भ – १४ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय)

## पवार, श्री. अजित अनंतराव



जन्म : २२ जुलै १९५९

जन्म ठिकाण : देवळाली प्रवरा, तालुका – राहुरी, जिल्हा – अहमदनगर.

शिक्षण : बी.कॉम.

ज्ञातभाषा :मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सुनेत्रा.

अपत्ये :एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : शेती.

पक्ष : राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष.

मतदारसंघ : २०१ – बारामती, जिल्हा– पुणे,

इतर माहिती :

विश्र्वस्त, विद्या प्रतिष्ठान, बारामती; सदस्य, रयत शिक्षण संस्था, सातारा; संचालक, छत्रपती शिक्षण संस्था, भवानीनगर, तालुका इंदापूर; संचालक, श्री. छत्रपती सहकारी साखर कारखाना, लि. भवानीनगर; संचालक, माळेगाव सहकारी साखर कारखाना, लि. संचालक, सोमेश्र्वर सहकारी साखर कारखाना, लि. जिल्हा पुणे, संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, मुंबई, संचालक, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे; मार्च १९९१ ते ऑगस्ट १९९१ तसेच डिसेंबर १९९४ ते डिसेंबर १९९८ अध्यक्ष, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; ११ डिसेंबर १९९८ ते १७ ऑक्टोबर १९९९ अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई; १९ डिसेंबर २००५ पासून संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध उत्पादक संघ; संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, मुंबई; २८ सप्टेंबर २००६ पासून अध्यक्ष, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, मार्च २०१३ पासून अध्यक्ष, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन, सप्टेंबर २००५ ते २३ मार्च, २०१३ अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, १३ ऑगस्ट २००६ ते १९ ऑगस्ट २०१८ अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य खो–खो असोसिएशन;

१७ जून १९९१ ते १८ सप्टेंबर १९९१ सदस्य, लोकसभा १९९१–९५ (पो.नि.), १९९५–९९, १९९९–२००४, २००४–२००९, २००९–२०१४, २०१४– २०१९, २०१९–२०२४ सदस्य, महाराष्ट्र विधान सभा; २८ जून १९९१ ते नोव्हेंबर १९९२ कृषी, फलोत्पादन व ऊर्जा खात्याचे राज्यमंत्री; नोव्हेंबर, १९९२ ते फेब्रुवारी, १९९३ जलसंधारण, ऊर्जा व नियोजन खात्याचे राज्यमंत्री; २७ ऑक्टोबर १९९९ ते २५ डिसेंबर २००३ पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण पाटबंधारे महामंडळे), फलोत्पादन खात्याचे मंत्री; २६ डिसेंबर २००३ ते ३१ ऑक्टोबर २००४ ग्रामविकास, पाणी पुरवठा व स्वच्छता, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण पाटबंधारे महामंडळे) खात्याचे मंत्री; ९ नोव्हेंबर २००४ ते ७ नोव्हेंबर २००९ जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून), लाभक्षेत्र विकास, पाणी पुरवठा व स्वच्छता खात्याचे मंत्री; ७ नोव्हेंबर, २००९ ते ९ नोव्हेंबर २०१० जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) व ऊर्जा खात्याचे मंत्री; ११ नोव्हेंबर २०१० ते सप्टेंबर २०१४ महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन आणि ऊर्जा); २२ डिसेंबर ते २७ डिसेंबर २०१९ उपमुख्यमंत्री, डिसेंबर २०१९ – जून २०२२ उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन), काहीकाळ राज्य उत्पादन शुल्क या खात्याचा अतिरिक्त कार्यभार.

जुलै २०२३ मध्ये उपमुख्यमंत्रीपदाची शपथ, खाती – वित्त व नियोजन

नोव्हेंबर २०२४ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड, दिनांक ५ डिसेंबर २०२४ रोजी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ.

(संदर्भ – १४वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय)

## फडणवीस, श्री. देवेंद्र गंगाधरराव



जन्म : २२ जुलै, १९७०

जन्म ठिकाण : नागपूर

शिक्षण : एलएल.बी. (नागपूर विद्यापीठ तृतीय मेरिट), एम.बी.ए., डिप्लोमा इन प्रोजेक्ट मॅनेजमेंट, डी. एस.ई. बर्लिन, जर्मनी येथून उत्तीर्ण

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती अमृता.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगी).

व्यवसाय : सामाजिक कार्य.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदार संघ : ५२ – नागपूर (दक्षिण–पश्र्चिम), जिल्हा – नागपूर.

इतर माहिती :

कार्यकारी सदस्य, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी (युनायटेड नेशन्सद्वारा मान्यता प्राप्त संस्था): उपाध्यक्ष, दि सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटी, नाशिक (भोसला मिलिटरी स्कूल), उपाध्यक्ष, राष्ट्रीय अपंग कल्याण संस्था, अध्यक्ष, स्व. आबाजी थत्ते अनुसंधान संस्थानचे नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट, नागपूर; अध्यक्ष, नागपूर जिल्हा बास्केट बॉल संघटना, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्य, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक, विविध उपक्रमात सहभाग.

१९८९ वॉर्ड अध्यक्ष, भारतीय जनता पक्ष, धरमपेठ वॉर्ड, नागपूर; १९९० प्रसिद्धी प्रमुख, भाजप, नागपूर (पश्र्चिम); १९९२–९५ अध्यक्ष, भाजप युवा मोर्चा, नागपूर शहर; १९९५–२००४ उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश, भारतीय जनता युवा मार्चा; २००४ – २००९, २००९ – २०१४ राष्ट्रीय उपाध्यक्ष, भारतीय जनता युवा मोर्चा; २००९ भाजप विदर्भ निवडणूक प्रमुख, २०१० महामंत्री, २०१२–२०१४ प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष; ग्लोबल पार्लमेंट या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारताचे प्रतिनिधीत्व करणारे प्रथम भारतीय लोकप्रतिनिधी; उपाध्यक्ष, ग्लोबल पार्लमेंट फोरम, हाबीतात; १९९२ व १९९७ नागपूर महानगर पालिका सदस्य व १९९७ मध्ये महापौर, महानगरपालिका, नागपूर; १९९८ मे अरइन कौन्सिल पद्धती अंतर्गत महाराष्ट्रातील प्रथम महापौर म्हणून निवड;

१९९९–२००४, २००४–२००९, २००९–२०१४, २०१४–२०१९, २०१९–२०२४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा, सदस्य, विधानमंडळ नियम समिती, सार्वजनिक उपक्रम समिती, विनंती अर्ज समिती, गृहनिर्माण व नगरविकास स्थायी समिती सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण समिती; सदस्य, कार्यकारी परिषद डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ; ओ.बी. सी, नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्राची उत्पन्न मर्यादा वाढविण्यासाठी यशस्वी प्रयत्न; अध्यक्ष, निती आयोग शेती विषयक उच्चाधिकार समिती, भारत सरकार, राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेच्यावतीने सन २००३ या वर्षाचा महाराष्ट्र विधानसभेतील उत्कृष्ट संसदपटु पुरस्कार प्राप्तः 'उत्कृष्ट वक्ता' म्हणून राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त; रोटरी क्लबचा मोस्ट चॅलेंजिंग युथ ॲवार्ड प्राप्त, हिंदू लॉ विषयात नागपूर विद्यापीठाचा बी. के. बोस ॲवॉर्ड प्राप्त; प्रमोद महाजन यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा मुक्तचंद पुणे या संस्थे तर्फे उत्कृष्ट संसदपटु पुरस्कार, प्रकाश जोशी यांच्या स्मरणार्थ दिल्या जाणाऱ्या राजयोगी नेता पुरस्काराने सन्मानीत; राज्य व राष्ट्रीय स्तरावरील अनेक पुरस्कारांनी सन्मानीत.

यशदा, पुणे येथे अर्बन फायनान्सिंग विषयावर व्याख्याने दिली. ३१ ऑक्टोबर २०१४ ते २१ नोव्हेंबर, २०१९ महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, २२ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर, २०१९ दुसऱ्यांदा मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, डिसेंबर २०१९ ते जून २०२२ महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्ष नेते.

३० जून २०२२ रोजी उपमुख्यमंत्री पदाची शपथ, खाती – गृह, विधी व न्याय, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, गृहनिर्माण, ऊर्जा, राजशिष्टाचार.

नोव्हेंबर २०२४ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड, दिनांक ५ डिसेंबर २०२४ रोजी तिसऱ्यांदा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ.

(संदर्भ – १४ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय)

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी आनंद मठात आनंद दिघे यांना केले अभिवादन



दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** राज्यात गुरुवारी नव्याने स्थापन झालेल्या सरकार मध्ये एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. या शपथविधी सोहळ्यानंतर एकनाथ शिंदे यांचे गुरुवारी रात्री उशिरा ठाण्यात आगमन झाले. टेंभी नाका येथील आनंद मठात जाऊन एकनाथ शिंदे यांनी धर्मवीर आनंद दिघे यांना अभिवादन केले. यावेळी टेंभी नाक्यावर शिवसैनिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. तसेच शिंदे यांच्या स्वागतासाठी डीजे आणि ढोल ताशा पथके आणण्यात आले होते. शिंदे यांचे टेंभी नाका येथील आनंद मठात आगमन होताच फटाक्यांच्या आतिषबाजी करत त्यांचे स्वागत करण्यात आले. विशेष म्हणजे यावेळी महिला शिवसेनिकांनी मोठ्या प्रमाणात आनंद मठात शिंदे यांना शुभेच्छा देण्यासाठी गर्दी केली होती.

राज्यात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला घवघवीत असे यश मिळाले. यात भाजपच्या सर्वाधिक जागा निवडून आल्या होत्या. परिणामी भाजपच्या देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी सायंकाळी मुंबईत आझाद मैदान येथे मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात शिवसेनेकडून एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेस कडून अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. हा शपथविधी सोहळा आटोपल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे गुरुवारी रात्री ठाण्यात परतले. ठाण्यात परतताच सर्वात प्रथम शिंदे यांनी टेंभी नाका येथील आनंद मठात जाऊन धर्मवीर आनंद दिघे यांच्या प्रतिमेला अभिवादन करत त्यांचे आशीर्वाद घेतले.

दरम्यान उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेऊन परतलेल्या शिंदे यांच्या स्वागतासाठी ठाण्यात टेंभी नाका येथे शिवसैनिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. शिंदे यांचे टेंभी नाका येथे आगमन होताच. फटाक्यांची एकच आतिषबाजी करण्यात आली तसेच ढोल ताशा वाजवत डीजेच्या तालावर शिवसैनिकांनी शिंदे यांच्या समर्थनार्थ जोरदार घोषणाबाजी केली.यावेळी आनंद मोठा शिवसैनिकांच्या वतीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे स्वागत आणि सत्कार करण्यात आला. यावेळी महिला कार्यकर्त्यांनी एकनाथ शिंदे यांना शुभेच्छा देत त्यांच्याबरोबर छायाचित्र काढण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही मग या महिला कार्यकर्त्यांबरोबर मोठया आनंदाने छायाचित्र काढले.

## महत्त्वाचे...

### देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर भाजप कार्यकर्त्यांकडून मोठा जल्लोष



दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर राज्यभरात भाजप कार्यकर्त्यांकडून मोठा जल्लोष करण्यात येतोय. त्याचप्रमाणे कोल्हापुरातील भाजप कार्यकर्त्यांनी मिरजकर तिकटी या ठिकाणी आनंदोत्सव साजरा करण्या आला. देवेंद्र फडणवीस शपथ घेताना थेट प्रक्षेपणाची व्यवस्था करण्यात आली होती. कार्यकर्त्यांनी शपथविधीनंतर जोरदार घोषणाबाजीही केली. त्याचबरोबर ढोल ताशांच्या गजरात ठेका धरत जमलेल्या नागरिकांना यावेळी मिठाईचे वाटपही करण्यात आले.

### बदलत्या वातावरणामुळे लहान मुलांमध्ये साथीचे आजार वाढले

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** बंगालच्या उपसागरामध्ये फेंगल चक्रीवादळ आल्यामुळे शहरात ढगाळ वातावरण आहे. काही ठिकाणी पाऊस पडला. यामुळे व्हायरल फिवरचा प्रादुर्भाव वाढला आहे. विशेषत: लहान मुलांमध्ये ताप, सर्दी, खोकला यासारखे आजार आढळत आहेत. लहान मुलांना तेलकट, आंबट व बाहेरचे पदार्थ खायला देऊ नये, मुलांना गरम पाणी द्यावे, लहान मुलांचे थंडीपासून संरक्षण करणे गरजेचे आहे अशी काळजी घेणे आवश्यक आहे. तसेच काही लक्षणे आढळून आल्यास तातडीने रुग्णालयात उपचार घ्यावे असे आवाहन आरोग्य अधिकारी डॉ. मेघा जोगदंडे यांनी केले आहे.

### चोपड्यात जिल्हास्तरीय विद्यार्थी संशोधन स्पर्धा; जिल्हा भरातील ४० महाविद्यालयातील ८०० विद्यार्थ्यांचा सहभाग



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** चोपडा येथील महाविद्यालयात कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र व चोपडा महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमानाने जिल्हास्तरीय विद्यार्थी संशोधन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या अविष्कार २०२४ ही स्पर्धा दरवर्षी भरविण्यात येते यावर्षी चोपडा येथे आयोजन करण्यात आले आहे या विद्यार्थी संशोधन स्पर्धेमध्ये जिल्हाभरातून ४० महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक ८०० पेक्षा जास्त जणांनी सहभाग नोंदविला आहे त्यातील ४८० जणांनी संशोधन प्रवेशिका सादर करण्यात आले आहे यासाठी विद्यापीठातून निरीक्षक तसेच परिक्षक टीमवर्क यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे या अविष्कार २०२४ विद्यार्थी संशोधन स्पर्धेला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद पाहावयास मिळत आहे.

### एपीएमसी मार्केटमध्ये कांद्याच्या दरात घसरण



दैनिक आपला विदर्भ


**नवी मुंबई/प्रतिनिधी :** वाशी एपीएमसी मार्केटमध्ये कांद्याच्या दरात मोठी घसरण झाली आहे. सध्या कांद्याचे दर ४० ते ६० रुपये प्रति किलोच्या दरम्यान स्थिरावले आहेत, जे काही दिवसांपूर्वी गगनाला भिडले होते. कांद्याच्या किमतींमध्ये दहा ते वीस रुपयांची घट झाल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले आहे. यामुळे आधी अर्धा किलो कांदा खरेदी करणारे ग्राहक आता एक किलोपर्यंत खरेदी करत आहेत, बाजारात कांद्याची उपलब्धता ही चांगल्या प्रमाणात असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले आहे.



### पतसंस्थेच्या महिला अध्यक्षावर सपासप वार, हत्या करून आरोपी पोलीस स्टेशनला

**पुणे/प्रतिनिधी :** चाकूने सपासप वार करून ३३ वर्षांच्या महिलेची हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार इंदापूरमध्ये घडला आहे. सुनिता दादाराव शेंडे असं मृत्यू झालेल्या महिलेचं नाव आहे. सुनिता या इंदापूर तालुक्यातील शेंडे वस्ती निमगांव केतकी येथील रहिवासी होत्या. आणखी धक्कादायक बाब म्हणजे सुनिता यांच्यावर वार केल्यानंतर आरोपीने थेट पोलीस स्टेशन गाठलं आणि गुन्ह्याची कबुली दिली. यानंतर पोलिसांनी त्याला अटक केली आहे. ज्ञानेश्वर बबन रासकर असं या आरोपीचं नाव आहे. पोलिसांनी त्याला अटक केली असून पुढील तपास सुरू केला आहे. ज्ञानेश्वरने सुनिता शेंडे यांची हत्या का केली? याचं कारण मात्र अजून स्पष्ट झालेलं नाही. ४ तारखेच्या रात्री ज्ञानेश्वरने निमगाव केतकी सराफवाडी रोडवर सुनिता शेंडे यांची हत्या केली आहे. आरोपी ज्ञानेश्वर रासकर हा इंदापूरच्या सुरवडचा रहिवासी आहे.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त चित्रकाराने जळत्या मेणबत्तीवर साकारले महामानवाचे चित्र



दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** कोणाचा जन्म कोणाला काय देऊन गेला,, आणि फक्त बाबासाहेबांचा जन्म.. आम्हाला न्याय देऊ गेला..जनावरा सारखे होते जिवन तो माणुस बनवून गेला.आम्ही होतो गुलाम आम्हाला बादशाहा बनवून गेला. म्हणून उद्या होत असणाऱ्या महामानव क्रांतीसुर्य विश्र्वरत्न बोधिसत्व परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त महाराष्ट्रात नव्हे तर देशातून महामानवाला अभिवादन करण्यासाठी मुंबईतील दादर येथे अनेक लोक जातात . त्याच अनुषंगाने नाशिक जिल्ह्यातील चांदवड तालुका भोगाव या गावातील किरण बाळू केदारे यांच्या निवासस्थानी येऊन त्यांनी कॉलिक कलंरचा वापर करून गेल्या जळत्या मेणबत्तीवर साडेतीन तासात महामानव बाबासाहेब आंबेडकर यांचे चित्र व त्यांना अभिवादन करण्यात आले.



## हे सरकार जनमतामुळे नाही तर ईव्हीएमच्या चोरीमुळे आले; शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांचा टिका

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील जनतेने दिलेला कौल हा महायुतीच्या बाजुने अजिबात नव्हता, त्यामुळे सर्वत्र उत्साहाचे वातावरण नसून शांतता आहे.हे सरकार जनमतामुळे नाही तर ईव्हीएमच्या चोरीमुळे आले आहे, अशी टिका शविसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी महायुती सरकारवर केली.त्या पुण्यातील उमेदवार आणि सुषमा अंधारे यांनी महायुती सरकार आणि ईव्हीएमच्या विरोधात धरणे आंदोलनादरम्यान केली. यावेळी सुषमा अंधारे म्हणाल्या की, आज आम्ही आंबेडकरांच्या पुतळ्याला अभिवादन करून पुन्हा ७ डिसेंबरपासून आंदोलनाला सुरुवात करणार आहोत. एकनाथ शिंदेंचे रुसवे फुगवे म्हणजे ड्रामेबाजी चालली आहे.असा आरोपही त्यांनी केला. महाराष्ट्राचे लक्ष ईव्हीएमवरून हटविण्याकरिता एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस रुसव्या फुगव्याची नाटके करत आहेत. जी लोक वीस वर्ष सेनेने सांभाळली त्यांनी गद्दारी केली तर अडीच वर्ष काहीच नाहीत. आज जर कोणी उदय सामंत यांना सांगितले की तुम्हाला मुख्यमंत्री करतो तर ते एका मिनिटात एकनाथ शिंदे यांच्याशी गद्दारी करतील. अजित पवार गटाने एकनाथ शिंदे यांची बार्गेनिंग पॉवर संपवत आणले आहे. गृह खाते तर नाहीच नाही, परंतु ऊर्जा आणि नगर विकास खाते सुद्धा मिळण्याची मारामार आहे. ज्यांना आमचे पक्ष सोडून जायचे आहे. त्यांना लखलाभ मी जाणार नाही.संघर्षाच्या रस्त्याने जाणे आम्हाला कबूल आहे. आम्हाला विरोधी बाकावर बसणे हे आमच्यासाठी नवीन गोष्ट नाही. तर आलेले सरकार हे जनमताच्या बळावर नाही तर ईव्हीएमच्या चोरीमुळे आले आहे. अशी टिका शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केली.

# जिल्हा युवा महोत्सवाचा समारोप

## ३५० पेक्षा अधिक युवावर्गाच्या सुप्त कलागुणांना मिळाली चालना

दैनिक आपला विदर्भ



**धाराशिव/प्रतिनिधी :** दोन दिवशीय जिल्हा युवा महोत्सवात युवा वर्गाच्या अंगी असलेल्या कलेच्या सुप्त कलागुणांना चालना मिळाली.जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व नेहरु युवा केंद्र यांचे संयुक्त विद्यमाने व राष्ट्रीय सेवा योजना,धाराशिव यांच्या सहकार्याने छत्रपती शिवाजी नाटयगृह,धाराशिव येथे ४ व ५ डिसेंबर रोजी आयोजित जिल्हास्तर युवा महोत्सवाचा उत्साहात समारोप झाला. जिल्हा युवा महोत्सवात जिल्हयातून ३५० युवक / युवती,विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेतून कला सादर केली. जिल्हा युवा महोत्सवात यश संपादन केलेल्या कलाकारांची विभागस्तरावरील युवा महोत्सवासाठी निवड करण्यात आली. जिल्हास्तर युवा महोत्सवामध्ये प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक संपादन केलेल्या संघ व कलाकारांना जिल्हा कोषागार अधिकारी अर्चना नरवडे,सार्वजनिक बांधकाम विभाग ( विद्यूत ) चंद्रकांत चकोते,जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे,नेहरू युवा केंद्रचे धनंजय काळे, राष्ट्रीय सेवा योजनेचे श्री.डी. वाय.साखरे, भोसले हायस्कुलचे प्राचार्य नंदकुमार ननवरे यांच्या हस्ते पारितोषक,स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी परिक्षक म्हणून मिलींद माने,सतीश ओव्हाळ,सुर्यकांत कापसे,श्रीराम नागरगोजे,विनोदकुमार वायचळ,माधुरी कुलकर्णी,दिपक दहिफळे,प्रा.डॉ.उमेश सलगर,सुहास झेंडे, प्रा.डॉ.वैभव आगळे, एस.डी.भोसले,एस.टी.गांगुर्डे,संजय कोथळीकर,डॉ. दत्तात्रय साखरे,डॉ. होळंबे, डॉ.ननवरे,श्री.वाघमारे,समीर माने,श्री.पौळ, श्री.नागापूरे,श्री. चौधरी यांनी काम पाहिले. जिल्हा युवा महोत्सवाचा अंतिम निकाल लोकनृत्य स्पर्धा (प्रथम) – भवानी शंकर बहुउद्देशीय संस्था,तुळजापूर (द्वितीय) –श्रीपतराव भोसले हायस्कुल,(तृतीय) – आर.पी.कॉलेज धाराशिव लोकगीत स्पर्धा (प्रथम) भवानी शंकर बहुउद्देशीय संस्था,तुळजापूर (द्वितीय) व्यंकटेश महाजन महाविद्यालय,धाराशिव,(तृतीय) जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येडशी कथा लेखन स्पर्धा (प्रथम) मुंढे वैभव विकास (द्वितीय) वाघमारे सुधांशु दिलीप (तृतीय) खोगरे वैष्णवी दत्तात्रय,वक्तृत्व स्पर्धा लेखन (प्रथम) शेख समीर मजनू (द्वितीय) आदिती आनंदराव ओव्हाळ (तृतीय) सायली सुरेश मुंडे,कविता लेखन स्पर्धा(प्रथम) अदमिले वैष्णवी धर्मराज (द्वितीय) मुंडे वैभव विकास (तृतीय) भोरे रोहित प्रभाकर फोटोग्राफी स्पर्धा(प्रथम) वैष्णवी आदमिले (द्वितीय) उमर फारूक शेख (तृतीय) वराळे सुनिल बाळासाहेब, चित्रकला स्पर्धा (प्रथम) जगदिश बसवराज सुतार,(द्वितीय) गायकवाड वैष्णवी नितीन,(तृतीय) गोरे काजल माणिक संकल्पना आधारित स्पर्धा ( विज्ञान व तंत्रज्ञान नवसंकल्पना ) (प्रथम) श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय तुळजापूर,(द्वितीय ) तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय, धाराशिव (तृतीय) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,धाराशिव विजेते ठरले.

## विविध वृत्त...

### देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर चंद्रपुरात कार्यकर्त्यांचा जल्लोष





दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी** : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबई येथे शपथ घेतली असून त्या अनुषंगाने भारतीय जनता पक्षाचे नवनिर्वाचित आमदार किशोर जोरगेवार यांच्या वतीने भारतीय जनता पक्ष चंद्रपूर विधानसभा क्षेत्र गांधी चौक येथे महापालिकेच्या पटांगणावर शपथविधी कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण जनतेला दाखविण्यात आले तसेच भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी लाडू वाटप करून जल्लोष साजरा करण्यात आला आहे.

### देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर खामगावात कार्यकर्त्यांकडून जल्लोष



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला घवघवीत असे यश मिळाले. आज मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री पदी एकनाथ शिंदे व अजित पवार यांनी शपथ घेतली. त्यानंतर बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव मतदार संघातील कार्यकर्त्यांच्या वतीने भाजप कार्यालयासमोर फटाक्यांची आतिषबाजी करून जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी भाजपचे आमदार आकाश फुंडकर यांच्या विजयाचे कट आउट बॅनर लावण्यात आले होते.

### देवेंद्र फडणवीसांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर यवतमाळमध्ये भाजपा कार्यकर्त्यांकडून जल्लोष




दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी** :देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. यानंतर राज्यभरात भाजप कार्यकर्त्यांकडून जल्लोष करण्यात येत आहे. यवतमाळ येथील भाजपाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करत पेढे वाटून जल्लोष साजरा केला आहे. यावेळी कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह पहायला मिळाला.

### १५ डिसेंबर रोजी बेळगाव येथे माजी सैनिक व संबंधितांच्या पेंशन व स्पर्शसंबधी अडचणीच्या निराकरणासाठी मेळावा

**धाराशिव/प्रतिनिधी** : जिल्ह्यातील माजी सैनिक, वीरनारी, विरपिता व सर्व व वयोवृद्ध सैनिकांसाठी पेंशन व स्पर्शसंबधी असलेल्या सर्व अडचणीचे निराकरण करण्यासाठी १५ डिसेंबर रोजी बेळगाव येथे मेळावा आयोजित करण्यात आला आहे.जिल्हयातील माजी सैनिक / वीरनारी / विरपिता व सर्व वयोवृद्ध सैनीकासाठी १५ डिसेंबर २०२४ रोजी मराठा लाईट इन्फंट्री रेजिमेंट सेंटर बेळगाव येथील शिवाजी स्टेडियम येथे सकाळी ८.३० ते दुपारी ४ वाजेपर्यंत मेळाव्यात उपस्थित राहावे.

या मेळाव्यामध्ये पेंशन व स्पर्शसंबधी असलेल्या शंका व अडचणीचे निराकरणा व्यतिरिक्त वन रैंक वन पेंशन व अन्य शासकीय योजनांबाबत माहिती व मार्गदर्शन प्रधान नियंत्रक रक्षा लेखा कार्यालय ( अधिकारी ) प्रयागराज कार्यालयातील प्रतिनिधी करतील.

तरी या मेळाव्याला सर्व सेवानिवृत्त सैनिक अधिकारी,माजी सैनिक / वीरनारी / विरपिता व सर्व वयोवृद्ध सैनिकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थीत रहावे. असे आवाहन मराठा लाईट इन्फंट्री रेजिमेंट सेंटर बेळगाव व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी धाराशीव यांनी केले आहे.अधिक माहितीकरिता दूरध्वनी क्रमांक ०८३१-२४०२८२१ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

# विकसित भारतातील 'समृद्ध महाराष्ट्रा'चा संदेश शपथविधी सोहळ्याने दिला

## राज्यसभा सदस्य डॉ.अनिल बोंडे यांची प्रतिक्रिया

### पाच वर्षात सुदृढ अर्थव्यवस्था असलेलं प्रगतशील राष्ट्र म्हणून राज्य लौकिक मिळवेल - बोंडे

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी** :मुंबईच्या आझाद मैदानावर महायुती सरकारचे प्रतिनिधित्व करत देवेंद्र फडणवीस यांनी तिसऱ्यांदा मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. विकसित भारतातील समृद्ध महाराष्ट्राचा संदेश शपथविधी सोहळ्याच्या माध्यमातून भाजपने दिला आहे. आगामी महायुती सरकारच्या पाच वर्षाच्या कार्यकाळात सुदृढ अर्थव्यवस्था असलेल प्रगतशील राष्ट्र म्हणून महाराष्ट्र देशात लौकिक मिळवेल, अशी प्रतिक्रिया राज्यसभा सदस्य तथा भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ.अनिल बोंडे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या शपथविधीच्या संदर्भात दिली आहे.

देवेंद्र फडणवीसंनी राज्याच्या मुख्यमंत्री पदाची शपथ तिसऱ्यांदा घेतली आहे. महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे, अजित पवार यांनी देखील शपथ घेतली. अतिशय ऐतिहासिक, भव्य असा शपथविधी सोहळा पार पडला. यावर प्रतिक्रिया देताना खासदार डॉ. अनिल बोंडे म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांचा शपथविधी तेवढाच अविस्मरणीय, दैदिप्यमान ठरला. याची देही याची डोळा हा शपथविधीचा कार्यक्रम संपूर्ण देशाने पाहिला. धर्मक्षेत्र, राजकारण, अर्थक्षेत्र, समाजकारण, उद्योग, यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची या सोहळ्याला उपस्थिती होती. हा शपथविधी पाहायचं भाग्य मला लाभलं त्यासाठी मी माझं भाग्य समजतो असं देखील अनिल बोंडे यांनी स्पष्ट केलं. देशभरातून शेकडो नागरिक या सोहळ्याला उपस्थित होते. यातून देवाभाऊ वरील संपूर्ण देशाचे प्रेम प्रामुख्याने अधोरेखित होत आहे. देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यावर महाराष्ट्रानं प्रेमाचा वर्षाव केला. एकंदरीतच शपथविधी सोहळ्याच्या माध्यमातून विकसित भारतातील समृद्ध महाराष्ट्राचा संदेश आज देशभरात गेला. भाजप आणि महायुतीच्या पाच वर्षाच्या कार्यकाळात महाराष्ट्र एक सुदृढ आणि सक्षम अर्थव्यवस्था म्हणून देशात समोर येईल. गोरगरिबांचे कल्याण, महिलांचे संरक्षण करण्याची जबाबदारी असलेलं राज्य देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात



आकार घेतल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास महाराष्ट्रातील नागरिकांमध्ये निर्माण झाल्याचा आशावाद देखील डॉ.अनिल बोंडे यांनी व्यक्त केला आहे.

## बुलडाणा येथे महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक

### विविध विषयांवर चर्चा : पुन्हा ताकतीने लढण्यासाठी सज्ज होण्याचे आवाहन




दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक दि.५ डिसेंबर रोजी बुलडाणा येथील मलकापूर रोडवरील राष्ट्रवादी भवन येथे संपन्न झाली.या बैठकी विविध विषयांवर चर्चा करून मंथन करण्यात आले. तर पराभवामुळे खचून न जाता पुन्हा ताकतीने लढावे, असे आवाहन यावेळी प्रमुख मान्यवरांनी केले. या बैठकीला जयश्री शेळके व राज्याचे माजी मंत्री महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष प्रा.लक्ष्मणराव ढोबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बुलडाणा विधानसभेत महाविकास आघाडीचा अवघ्या ८४१ मतांनी पराभव झाला असला तरी या पराभवाने खचून न जाता महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पुन्हा ताकतीने लढावे, असे मत यावेळी प्रमुख मान्यवरांनी व्यक्त करत कार्यकर्त्यांची हिम्मत वाढवली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष माजी आ.रेखा खेडेकर,आ.धीरज लिंगाडे, माजी आ.हर्षवर्धन सपकाळ, शिवसेना (उबाठा) संपर्कप्रमुख नरेंद्र खेडेकर, शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख जालिंधर बुधवत, काँग्रेस कमिटी महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष संजय राठोड, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा कार्याध्यक्ष नरेश शेळके,डी. एस. लहाने, गणेशसिंग राजपुत, सुनिल सपकाळ, नंदु कऱ्हाडे, बी.टी. जाधव, पी.एम. जाधव, सुनिल तायडे, लखन गाडेकर, विजय इंगळे, डॉ. शरद काळे,गजानन मामलकर, सतिष मेहेंद्र,दत्ताभाऊ काकस,सुनील घाटे, नजमा, विजया खडसान, प्रमिल गवई, पदाधिकारी व कार्यकर्ते यांची विशेष उपस्थिती होती.

यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार तसेच मित्रपक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या बैठकीत विविध विषयांवर चर्चा करून मंथन करण्यात आले. तर पराभवामुळे खचून न जाता पुन्हा ताकतीने लढावे, असे आवाहन यावेळी महाविकास आघाडीच्या पदाधिकार्यांनी व्यक्त केले.

## एकनाथ शिंदे यांची उपमुख्यमंत्रीपदी निवड बुलडाण्यात शिवसेनेच्यावतीने जल्लोष

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला घवघवीत असे यश मिळाले. तर दि. ५ डिसेंबर रोजी मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे व अजित पवार यांनी शपथ घेतली. उपमुख्यमंत्रीपदी निवड होताच बुलडाण्यात शिवसेनेच्या वतीने बुलडाणा शिवसेना जिल्हा प्रमुख ओमसिंग राजपूत, शिवसेना कार्यकारणी सदस्य मृत्युंजय गायकवाड यांच्यासह शिवसैनिकांच्यावतीने जल्लोष करण्यात आला. नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा



निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश आले आहे. तर दि. ५ डिसेंबर रोजी मुंबईत हा शपथविधी सोहळा मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आल आहे.उपमुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे यांनी निवड होऊन उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेताच बुलडाण्यात शिवसेना कार्यालयासमोर कार्यकर्त्यांनी बुलडाणा शिवसेना जिल्हा प्रमुख ओमसिंग राजपूत, शिवसेना कार्यकारणी सदस्य मृत्युंजय गायकवाड यांच्यासह शिवसैनिकांच्यावतीने फटाके फोडत जल्लोष साजरा करण्यात आला. तर मिठाई वाटप करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

## किसान क्रेडीट कार्डसाठी मच्छिमारांनी नोंदणी करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : केंद्र शासनाने प्रधानमंत्री मत्स्य किसान समृध्दी सह-योजनेंतर्गत सर्व पात्र मच्छिमार व मत्स्यकास्तकार यांना किसान क्रेडीट कार्डची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सन २०२४-२५ करीता दि. ३१ मार्च २०२५ पर्यंत देशव्यापी किसान क्रेडीट कार्ड (केसीसी) मोहिम राबविण्याबाबतचे निर्देश दिले आहेत. या मोहिमेंतर्गत सर्व पात्र मच्छिमार, मत्स्यसंवर्धक व मत्स्यव्यवसायांनी नॅशनल फिशरीस डिजीटल प्लॅटफॉर्म (एनएफडीपी) वर नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मत्स्यव्यवसायाच्या अधिकाधिक विकासात्मक योजना राबविण्यासाठी धोरणात्मक दृष्टीकोनातून तसेच प्रधानमंत्री मत्स्य किसान समृध्दी सहयोजनेचा लाभ मिळण्यासाठी देशातील मत्स्यव्यवसायाशी संबंधितांची एनएफडी वर नोंदणी करण्यासाठी केंद्र शासनाने सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालय, कॉमन सर्विस सेंटर, सेवा केंद्र व सेतू यांना प्राधिकृत केलेले आहे. मच्छिमार व मत्स्यव्यवसायिक यांनी http://NFDP.dof.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी. त्याकरीता आपल्या गावानजीकच्या सेवा केंद्र, कॉमन सर्विस सेंटर व सेतू येथे संपर्क साधावा. तसेच आपल्या मत्स्यव्यवसायिक संस्थेची व संस्थेतील सभासदांची तसेच मत्स्यव्यवसायिक कोणत्याही संस्थेत सभासद नसल्यास त्यांनी आपल्या मत्स्यव्यवसायाशी संबंधित कोणतेही पूरक कागदपत्रे एनएफडीपी संकेतस्थळावर अपलोड करुन आपली नोंदणी करुन घ्यावी. नोंदणीअंती प्राप्त प्रमाणपत्राची एक छायाप्रत सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय, प्रशासकीय इमारत, बसस्टँडच्या समोर, बुलढाणा येथे सादर करावी.


एनएफडीपी नोंदणीसाठी मत्स्यव्यवसायिकाचे आधारकार्ड, बँक पासबुक व आधार जोडणी असलेला मोबाईल आवश्यक असून त्यासह नजीकच्या सोईच्या सेवा केंद्र किंवा सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय, प्रशासकीय इमारत, पहीला मजला, एसटी डेपोच्या समोर, धाड रोड, बुलढाणा येथे ०७२६२-२४२२५४ व http://pmmkssy.dof.gov.in वर संपर्क करावा, असे आवाहन मत्स्यव्यवसायचे सहायक आयुक्त सु.ग. गावडे यांनी केले आहे.

# मेहकर येथील पोलीस स्टेशनच्या ४ कोटी खर्चाच्या नव्या इमारतीच्या बांधकामास प्रारंभ

## माजी आ. संजय रायमुलकर यांनी केली पाहणी

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या चार कोटी रुपये खर्चाच्या मेहकर पोलीस स्टेशनच्या नव्या इमारतीच्या बांधकामास आज सुरुवात झाली असून या कामाची पाहणी संजय रामुलकर यांनी करून बांधकाम दर्जे दार करण्याच्या सूचना कंत्राटदारास दिल्या.



संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नातून जानेफळ व मेहकर येथील पोलीस स्टेशनच्या नव्या इमारतींचे आठ कोटी रुपयांचे बांधकाम मंजूर झाले होते. त्यापैकी जानेफळ पोलीस स्टेशनच्या अध्ययवत इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे. मेहकर पोलीस स्टेशनची जुनी इमारत इंग्रज कालीन असून ती १९२२ साली टिनपत्रे ,कौलारू अशा पद्धतीने उभारण्यात आली होती. तब्बल १०२ वर्षानंतर आता नवीन सुसज्ज अशा इमारतीचे बांधकाम सुरू झाले आहे.

मेहकर लोणार तालुक्यातील पोलीस स्टेशनच्या इमारतींचे बांधकाम व अधिकारी, कर्मचारी निवासस्थाने बांधकामाच्या मंजुरीसाठी संजय रायमुलकर यांनी शासन दरबारी सातत्याने प्रयत्न करून काही कामे मंजूर करून आणली. मेहकर पोलीस स्टेशनची इमारत बहुमजली असून त्यात पोलीस निरीक्षक कार्यालय व पोलीस निरीक्षक यांची कार्यालये



यासह इतर अनेक शाखांसाठी स्वतंत्र कार्यालये ,स्वच्छतागृहे याची व्यवस्था करण्यात येणार आहे. संजय रायमुलकर यांनी आज सदर कामाची पाहणी करून काम दर्जेदार करण्याबाबत कंत्राटदारास सूचना दिल्या. यावेळी शिवसेनेचे उपतालुकाप्रमुख समाधान साबळे, शहर प्रमुख जयचंद बाठिया, संतोष पवार, दुर्गादास रहाटे, माधव तायडे,मनोज जाधव, विकास जोशी,विनोद भिसे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.